**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८**
**मध्यवर्ती भांडार विभाग**
**भांडार खरेदी**
**ई - निविदा सुचना क्रमांक १२/२/२०१०-२०११**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दवाखाने व रुग्णालयांसाठी आवश्यक लिनन साहित्य खरेदी करणेकामी उत्पादीत कंपनी, त्यांचे अधिकृत वितरक/विक्रेते/पुरवठाधारक यांचेकडून ई-टेंडरींग कार्यप्रणालीद्वारे निविदा मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | अंदाजे किंमत | अनामत र.रुपये | बयाणा र.रु. | फॉर्म फी र.रु. | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | मनपा दवाखाने व रुग्णालयां साठी आवश्यक लिनन साहित्य पुरविणे (सोबतचे शेडयुलप्रमाणे) | ४०,८३,३००/- | २,०४,१६५/- | ४०,८३३/- | १०००/- | ६महीने |

सदरची निविदा, पुरवठयाचा तपशिल, अनामत, बयाणा रक्कम, नियम, अटी, निविदा शेडयुल निविदेसाठी नोंदणी इत्यादीची माहिती मनपाच्या **www.pcmcindia.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे. याकामी मनपाच्या भांडार विभागात पुरवठाधारकांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. सदरची निविदा भरणेसाठी नोंदणी अर्ज दि. २०/०८/२०१० दुपारी ३-०० वाजेपर्यंत सादर करण्यात यावेत. सदरची ऑनलाईन निविदा दिनांक १३/०८/२०१० ते दिनांक ०२/०९/२०१० अखेर दुपारी ३-०० वाजेपर्यंत भरता येईल. कोणतेही कारण न देता निविदा पूर्णत: किंवा अंशत: मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार मा.आयुक्त यांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे. सदरची ऑनलाईन निविदा www.pcmcgisda.org.in या वेबसाईटवरुन भरता येईल.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

जाहिरात क्रमांक :- १३१
क्रमांक - मभां/९/कावि/४८३/२०१०
दिनांक - ११/०८/२०१०

सही/-
सहाय्यक आयुक्त (भांडार)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी -४११०१८**
**मध्यवर्ती भांडार विभाग**
**भांडार खरेदी**
**ई - निविदा सुचना क्रमांक - १२/२/२०१०-२०११**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दवाखाने व रुग्णालयांसाठी आवश्यक लिनन साहित्य खरेदी करणेकामी उत्पादीत कंपनी, त्यांचे अधिकृत वितरक/ विक्रेते /पुरवठाधारक यांचेकडून ई-टेंडरींग कार्यप्रणालीद्वारे निविदा मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | अंदाजे किंमत | अनामत र.रुपये | बयाणा र.रु. | फॉर्म फी र.रु. | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मनपा दवाखाने व रुग्णालयां साठी आवश्यक लिनन साहित्य पुरविणे (सोबतचे शेडयुलप्रमाणे) | ४०,८३,३००/- | २,०४,१६५/- | ४०,८३३/- | १०००/- | ६महीने |

**नियम, अटी व शर्ती -**

१) सदर निविदेतील पुरवठ्याचा तपशिल, अनामत, बयाणा रक्कम, नियम, अटी,निविदा शेड्युल इत्यादीची माहिती मनपाच्या **www.pcmcindia.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदरची निविदा मनपाच्या फक्त ई-टेंडरींग पध्दतीने वेबसाईटवरून भरावयाची आहे. याकामी मनपाच्या भांडार विभागात पुरवठाधारकांनी त्यांची नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी करणेसाठी नोंदणी फी र.रू. ३,०००/- चा डिमांड ड्राफ्ट व आवश्यक प्रमाणीत कागदपत्रे भांडार विभागात सादर करणे आवश्यक आहे. नोंदणीबाबतची सविस्तर माहिती व नोंदणी फॉर्म भांडार विभागात मिळेल.

सदरची नोंदणी या निविदेक्रीता दि.२०/०८/२०१० दुपारी ३.०० वाजेपर्यंत करण्यात येईल. नोंदणी करताना आयकर भरत असलेबाबत पुरावा, अद्यावत विक्रीकर नोंदणी, शॉप ॲक्ट दाखला अथवा कंपनी नोंदणी प्रमाणपत्र, उत्पादित कंपनीचे अधिकृत विक्रेते,वितरक असलेचे पत्र, इत्यादी मुळ कागदपत्रे सादर करावी लागतील. सदरची निविदा फक्त ई-टेंडरींग प्रक्रीयेअंतर्गत दिनांक १३/०८/२०१० ते दि.०२/०९/२०१० अखेर दुपारी ३.०० वाजेपर्यंत भरता ई-टेंडरींग पध्दतीने(Down load & up load) वेबसाईडवरुनच भरता येईल. जे निविदाधारक E--tendering प्रक्रीये अंतर्गत नोंदणी करतील त्यांनाच Digital Key देण्यात येणार आहे. त्यांनाच फक्त निविदा भरता येईल.निविदाकारंनी निविदेची फॉर्म फी, बयाणा, रक्कम मनपा खात्यात पेमेंट गेटवे सिस्टीम द्वारे (Electrocnic Banking service) भरावयाची आहे.सदर निविदेचे फॉर्म विक्रीसाठी ठेवणेत येणार नाहीत व फॉर्म क्स्वकृतीसाठी निविदा बॉक्स ठेवणेत येणार नाही. यापुर्वी नोंदणी केलेल्या ठेकेदारांनी निविदा भरताना उत्पादित कंपनीचे अधिकृत विक्रेते, वितरक असलेचे पत्रे सत्यप्रत करुन स्कॅन करुन ॲटच फाईलद्वारे देण्यात यावे. आवश्यक जादा कागदपत्रे द्यावावयाची असलेस निविदेसोबत स्कॅन करूनच व सत्यप्रत करून अपलोड करता येतील.

२) पुरवठाधारकाने आपले दर सर्व करासह (उदा.जकात, वहातुक इत्यादी) देणे आवश्यक आहे.

३) अटीयुक्त निविदा स्विकृत क्रणेत येणार नाही.

४) निविदा मंजूर पुरवठाधारकास करारनामा करणेपुर्वी असा ठेकेदार / ठेकेदारी संस्था म.न.पा.चे विद्यामान नगरसेवक व स्विकृत सदस्य यांचेशी संबधीत नाही याबाबत र.रु.१००/- चे स्टँपपेपरवर प्रतिज्ञापत्र नोटराईज करुन द्यावे लागेल.

५) निविदा दर मंजूरी दिल्यानंतर शासनाने यामध्ये काही दरवाढ केल्यास कोणतीही दरवाढ मंजूर केली जाणार नाही.

६) साहित्य आयात करताना म.न.पाच्या नियमानुसार जकात भरणे आवश्यक आहे. जकात माफीचा दाखला मिळणार नाही.

७) निविदा मंजूर झाल्यानंतर पुरवठाधारकास एकूण रकमेच्या ५% प्रमाणे होणारी रकमेतन भरलेली बयाणा रक्कम वजा जाता उर्वरीत अनामत रक्कम ही राष्ट्रीय/शेडयुल बँकेच्या एफडीआर. द्वारे भरावी लागेल. तसेच अनामत रकमेच्या ३% प्रमाणे होणारी रक्कम अधिक र.रु.१००/- चे स्टँप पेपरवर स्वखर्चाने लेखी करारनामा करुन द्यावा लागेल.

कृमाप..

८) मंजूर केलेले नविदा दर हे आदेशाचे तारखेपासून १वर्षे कालावधीसाठी ग्राह्य राहील. तसेच मंजूर केलेले दर पुरवठा धारकांवर बंधनकारक राहतील.

९) निाविदेतील स्पेसिफिकेशनप्रमाणे व दिलेल्या सुचनेप्रमाणे साहित्याचा पुरवठा स्वखर्चानेपुरवठा आदेशात नमुद केलेल्या ठिकाणी करावा लागेल. अन्यथा साहित्य स्विकारण्यात येणार नाही.

१०) पुरवठा आदेशात दिलेल्या मुदतीत साहित्य न पुरवल्यास, या विभागाने ठरविलेला विलंब आकार आकारण्यात येईल. मुदतवाढ देणे अथवा न देणे हे विभागप्रमुखांवर अवलंबून राहील.

११) निविदेसोबत प्रत्येक लिनन साहित्याचे दोन नमुने मध्यवर्ती भांडार विभागात सादर करावे. अन्यथा निविदेचा विचार केला जाणार नाही.

१२) सदरची निविदा स्विकृतीचे अंतिम दिनांकाचे दिवशी दुपारी ३=३० वाजता किंवा निविदा कमिटी ठरवील त्या दिवशी व वेळेस निविदा उघडण्यात येतील. त्याबाबतची सुचना मनपा वेबसाईटवर देणेत येईल.निविदा उघडण्याच्या वेळी निविदाकार स्वतः अथवा त्यांचा प्रातिनिधी उपस्थित राहू शकेल.

१३) निविदा मंजूर पुरवठाधारकाने पुरविलेले लिनन साहित्य स्पेसिफिकेशन प्रमाणे किंवा त्याच कंपनीचे असलेबाबत सक्षम अधिकारी यांची खात्री झाल्याशिवाय साहित्य स्विकारण्यात येणार नाही.

१४) निविदा मंजूर पुरवठाधारकाने साहित्याचा पुरवठा करणेस असमर्थता दर्शविलेस किंवा साहित्याचा पुरवठा अर्धवट केल्यास किंवा निविदेतील कोणत्याही अटीचा भंग केलेस त्यांनी त्या कामापोटी भरलेली बयाणा / अनामत रक्कम जप्त करुन पुरवठा आदेश रद्द करणेत येईल.व ५ वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्यात येईल.

१५) सदर साहित्याची तांत्रिक तपासणी मनपाचे सक्षम अधिकारी/मनपाने प्राधिकृत केलेल्या संस्था,/अधिकारी/शासकीय, निमशासकीय संस्था/ प्रयोगशाळा, यांचेकडून करण्यात येतील. याकामी येणारा खर्च संबंधित निविदाकारास करावा लागेल. पुरवठा केलेले साहित्य स्पेसिफिकेशन प्रमाणे, तांत्रिक विवरणानुसार व दिलेल्या सुचनेप्रमाणे असलेबाबत प्रमाणित केल्यावरच साहित्य ताब्यात घेणेत येईल.

१६) पुरवठा केलेल्या प्रत्येक साहित्यावर “पीसीएमसी सप्लाय २०१०-२०११” व “सिरीयल नंबर अनइव्हीडेबल शाईने” योग्य त्या आकारमानात छापणेत यावा.

१७) निविदा मंजूर पुरवठा धारकाने निविदेसोबत जोडलेली कागदपत्रे अवैध,अपुर्ण किंवा दिशाभूल करणारी असलेस तसेच करारनामा करणेस पाचारण केले असता करारनामा करणेस टाळाटाळ केलेस, किंवा करारनामा करणेस असमर्थता दर्शविलेस,तसेच साहित्याचा पुरवठा करणेस असमर्थता दर्शविलेस,किंवा साहित्याचा पुरवठा अर्धवट केलेस सदर कामापोटी जमा केलेली बयाणा,अनामत रक्कम जप्त करून पुरवठा आदेश रद्द करण्यात येईल.

१८) कोणत्याही साहित्याचा पुरवठा कमी जास्त किंवा रद्द करणेचा अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

१९) निविदाधारकांवर निविदेतील, सर्व अटी शर्ती तसेच सक्षम अधिका-यानी दिलेल्या सुचना बंधनकारक राहतील. यापैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग केल्यास निविदाकारांचे बयाणा अनामत रक्कम जप्त करून पुढील योग्य ती अ. क्र. १२ मधील कार्यवाही करणेत येईल.

२०) सर्वसाधारण परिस्थितीमध्ये या पुरवठयापोटी भरलेली अनामत रक्कम १००% काम पूर्ण झाल्या नंतर ६ महिन्यानंतर किंवा अंतिम देयक अदायगीनंतर ३ महिन्यांनी परतावा पात्र राहील. अंशताः अनामत परतावा पात्र नसेल. तसेच हमी कालावधीतही परतावा पात्र नसेल.

२१) निविदे सोबत खोटी, बनावट व दिशाभुल करणारी कागदपत्रे जोडल्यास व तसे सिध्द झाल्यास बयाणा / अनामत रक्कम जप्तीस पात्र राहील.

२२) मालाचा पुरवठा मनपा ठरविल त्याप्रमाणे दोन टप्प्यात निश्चित परिमाणासाठी करावा लागेल.

२३) साहीत्य पुरवठयापुर्वी तयार करावयाचे मालाचा प्रत्येकी एक नमुना प्रथम आदेशीत परिमानानुसार वैद्यकिय भांडाराकडून तपासून तो बरोबर असल्यासच उर्वरित माल तयार करुन पुरवठा करणेत यावा.

२४) ज्या उत्पादित कंपनीचे कापडाचा वापर केला आहे त्याचे खरेदीचे पुरावे बिलासोबत सादर करावे लागतील.

२५) कोणतीही निविदा पुर्णतः अथवा अंशतः मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार मा. आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

ठेकेदारांची सही व शिक्का

सही/-
सहाय्यक आयुक्त (भांडार)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
### मध्यवर्ती भांडार विभाग
### ई - निविदा सुचना क्रमांक - १२/२/२०१०-२०११
### निविदा शेड्युल

पुरवठाधारकाचे नाव :-
पत्ता :-

| अ.क्र. | लिनन साहित्याचा तपशिल | परिमाण | एकक | उत्पादित कंपनी | प्रती नग दर अंकी र. रु. | प्रती नग दर अक्षरी र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **बेडशिट** १३७ X २२९ सेमी | ४००० | नग | | | |
| २. | **पिलो कव्हर** १७इंच X २६ इंच | २००० | नग | | | |
| ३. | **टॉवेल मोठा** ३० X ६० इंच | २५ | नग | | | |
| ४. | **स्त्री रुग्ण गाऊन (गुलाबी)** ५०इंच उंची, ७४ इंच घेर | २००० | नग | | | |
| ५. | **पेशंट गाऊन पांढरे** फ्रिसाईज (मान्य नमुन्याप्रमाणे ) | १०० | नग | | | |
| ६. | **वुलन ब्लँकेट** (Standard Size) १५० X २२० से.मी. | १००० | नग | | | |
| ७. | **ॲबडेमिन शीट (हिरवे)** होल ७०इंच उंची, ६० इंच रुंदी | २००० | नग | | | |
| ८. | **ओ टी सर्जन गाऊन (हिरवा)** फ्रिसाईज ५०इंच उंची, ७४इंच घेर | ५०० | नग | | | |
| ९. | **कॉटन (सर्जन) कॅप हिरवे** ७.५इंच उंची बाय २५ इंच लूजींग | १००० | नग | | | |
| १०. | **स्त्री डॉ. पायजमा कुर्ता** (स्काय ब्ल्यु ) पायजमा- ३९ इंची कुर्ता- ४० इंची लांबी, १७ इंच शोल्डर, ५इंच मागचा गळा, ९ इंच बाही, १५ इंच दंड | ८०० | नग | | | |
| ११. | **पुरुष डॉ. पायजमा कुर्ता** पायजमा-४०इंच लांबी, २०इंच बॉटम कुर्ता- ३१इंच लांब, २०इंच शोल्डर,१४ इंच बाही,१४ इंच दंड, ४८ इंच छाती, ५२इंच घेर | २०० | नग | | | |
| १२. | **मच्छरदाणी (कॉटन,)** सिंगल बेडची, रस्सी बांधणेसाठी हुकसह | ३० | नग | | | |
| १३. | **सोलापुरी चादर** ६० X ९० इंच | १२०० | नग | | | |

कृमाप..

| अ.क्र. | लिनन साहित्याचा तपशिल | परिमाण | एकक | उत्पादित कंपनी | प्रती नग दर अंकी र.रु. | प्रती नग दर अक्षरी र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १४. | **पुरुष रुग्ण गणवेश**<br>रंगीत पट्टयाचा शर्ट+पायजमा<br>शर्ट- ३१ इंच लांबी २१इंच शोल्डर,२५ इंच बाही १३ इंच कफ १२.५ लुजींग<br>पायजमा- उंची ४१ इंच,बॉटम २६ इंच | १००० | नग | | | |
| १५. | **क्वायर फोम मॅट्रेस(गादी )**<br>६फुट लांब X३फुट रुंदी X४इंच इंच जाडी | २४० | नग | | | |
| १६. | **ड्रॉ शिट (हिरवा)**<br>४८इंच X २४ इंच | २०० | नग | | | |
| १७. | **ड्रॉ शिट (हिरवा)**<br>४८इंच X३६इंच | १००० | नग | | | |
| १८. | **हिरवे मास्क**<br>१०इंचलांबी X ४इंच रुंदी प्लेट सहीत जाड नाही | २००० | नग | | | |
| १९. | **होल टॉवेल**<br>४८ X ३६ इंच | १५० | नग | | | |
| २०. | **व्हाईट ऑपथॉल्मीक शिट** (वुईथ होल )<br>३६इंच X ३६ इंच | ५० | नग | | | |

वरील सर्व लिनन साहित्य हे सेंच्युरी मिल/ अरविंद मिल/ बॉंबे डाईंग या कंपनीचे उत्पादित कापडापासून बनविलेले असले पाहिजेत.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पुरवठाधारकाची सही व शिक्का

सही/-
सहाय्यक आयुक्त (भांडार )
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८